A-PDF Merger DEMO : Purchase from www.A-PDF.com to remove the watermark

| | | |
|---|---|---|
| | पावती | Original/Duplicate |
| Wednesday,December 18 ,2013 1:28 PM | | नोंदणी क्रं. :39म<br>Regn.:39M |

पावती क्रं.: 7963 दिनांक: 18/12/2013

गावाचे नाव: चिखलोली
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: उहन3-7882-2013
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: प्रशांत आदित्य शुक्ला

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 1160.00 |
| पृष्ठांची संख्या: 58 | |
| एकूण: | रु. 31160.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट व सीडी अंदाजे 1:44 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Ulhasnagar 3

सह दुय्यम निबंधक वर्ग-२ उल्हासनगर क.३

बाजार मुल्य: रु.17480000 /- मोबदला: रु.17480000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 1149200/-

1) देयकाचा प्रकार: By Demand Draft रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 648269 दिनांक: 17/12/2013
बँकेचे नाव व पत्ता: Kotak Mahindra Bank LTD
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 1160/-

Prashant Shukla

उ न न - ३

6662 / २०१३

3. असा वरील उल्लेखित मिळकतीचा 7/12 वरील सौ. रंजना रमेश चहाळे यांनी नमुद मिळकतीमधील आपला असलेला हक्क हा दिनांक 19/11/2013 रोजीच्या हक्कसोडपत्राद्वारे श्री.संतोष जगन्नाथ म्हात्रे यांच्या लाभात सोडुन दिला. सदरचे हक्कसोडपत्र दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर - 3 यांच्या कार्यालयात दस्त क. 7058 /2013 अन्वये नोंदविण्यात आलेला आहे. तसेच सदरहु मिळकतीच्या 7/12 वरील श्रीमती. कमलाबाई जगन्नाथ म्हात्रे, शंकूतला रघुनाथ जोशी, ताराबाई अनंता भोईर, वैजयंता नामा गायकर, निर्मला लक्ष्मण पाटील, रंजना जगन्नाथ म्हात्रे यांनी आपला सदर मिळकतीमधील असलेला हक्क आपले भाउ श्री. संतोष जगन्नाथ म्हात्रे व यशवंत जगन्नाथ म्हात्रे यांच्या लाभात दिनांक 11/12/2013 रोजी कायमस्वरुपी सोडला. सदर हक्कसोडपत्र हे दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर - 3 यांच्या कार्यालयात दस्त क. 7639/2013 अन्वये नोंदविण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे लिहून देणार यांच्या नावाची नोंद नमुद मिळकतीच्या 7/1[illegible] झाली असून तेव्हापासून आजपर्यंत लिहून देणार हे सदरहू मिळकतीचा मालकी ह[illegible] उत्पन्न उपभोग घेत आहेत.

4. अशी वरील उल्लेखित मिळकत ही प्रथम पक्षीय यांना विकसित करावयाची होती. परंतू सदर मिळकत विकसित करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान व पुरेसे भांडवल लिहून देणार यांच्याकडे नसल्याकारणाने लिहून देणार प्रथम पक्षीय यांनी सदरहू मिळकत इच्छुक विकासकास विकसित करण्यासाठी देण्याचे निश्चित केले. सदर घटनेची कल्पना द्वितीय पक्षीय यांना झाली व द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांच्याकडे सदरहू मिळकत विकास करण्यासाठी मागितली. व्दितीय पक्षीय हे अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये एक नावाजलेले विकासक असून व्दितीय पक्षीय यांना जमिनीच्या विकास कार्याचा चांगला अनुभव असल्याची खात्री प्रथम पक्षीय यांना झाल्याने प्रथम पक्षीय यांनी व्दितीय पक्षीय यांस सदर आपल्या मालकी हक्काची मिळकत विकसित करण्यासाठी देण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे दोन्ही पार्टीच्या बैठक/चर्चा झाल्या. व चर्चेअंती विकास करारनामा लिहून देणार प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीय यांना सदरची मिळकत विकसित करण्यासाठी देण्याचे मान्य केले व त्याप्रमाणे खालील अटी व शर्तीच्या आधारे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सदर मिळकत विकसीत करण्यासाठी

संतोष जगन्नाथ म्हात्रे

यशवंत जगन्नाथ म्हात्रे

उहन - ३
८८८ / २०२३
२० / ९८



देण्याचे निश्चित केले व त्याप्रमाणे सदरहू मिळकत विकसित करण्याचा करारनामा प्रथम पक्षीय व द्वितीय पक्षीय यांच्यामध्ये करण्यात येत आहे.

5. **सदरहू विकास करारनाम्याच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणेः-**

1. लिहून देणार यांना सदरहू मिळकतीची निगा राखणे, अथवा सदरहू मिळकत स्वतः विकसीत करणे शक्य नसल्याकारणाने सदरहू मिळकतीचा विकास हक्क विकासकर्त्यांना दिल्यास त्यातून मिळणा-या पैशातुन व वास्तुरुपी मोबदल्यातून कुटुंबाची योग्य ती सोय करता येईल व इतर अनुषांगिक कारणांमुळे लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकास हक्क विकासकर्ता यांना देण्याचे ठरविले. लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकसित हक्क देत आहेत. यांची माहिती मिळाल्यावर लिहून घेणार यांनी लिहून देणार यांची प्रत्यक्ष भेट घेतली व मिळकत विकसित करण्यासंदर्भात बोलणी करतेवेळी लिहून देणार यांनी असे जाहिर केले की सदरची मिळकत ही त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे व सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध व अधिकार नाही असल्यास लिहून देणार मिटवून देतील. द्वितीय पक्षीय लिहून देणार यांना सदरहू मिळकतीचा विकासाच्या पोटी देवू केलेला मोबदला प्रचलीत बाजार भावाप्रमाणे योग्य व रास्त असल्याची खात्री पटल्यावर व सदरहू मिळकतीचे विकसित हक्क कुटुंबाच्या भल्याकरिता उन्नतीकरता असल्यामुळे लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकसित हक्क लिहून घेणार यांना देण्याचे मान्य व कबूल केले.

2. सदरहू जमिनीची मिळकत लिहून देणार यांच्या निर्विवाद मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे व अशी मिळकत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस विकसित करण्याकरिता दिली आहे आणि म्हणूनच त्याचा मोबदला म्हणून लिहून घेणार हे लिहून देणार यांना सदरहू मिळकतीवर अंबरनाथ नगरपरिषदेकडून मंजुर होणा-या प्लॅन प्रमाणे जे एकूण बांधकाम मिळणार आहे त्या एकूण प्राप्त होणा-या बांधकामापैकी 40 टक्के निवासी / वाणिज्य बांधकाम हे लिहून देणार यांना दिले जाईल. लिहुन देणार यांना दयावयाचे बांधकामामध्ये कुठल्याही प्रकारे वाणिज्य बांधकामाचा समावेश असेल. सदर 40 टक्के बांधकामामधील चार सदनिका हया लिहून देणार क्र. 3 व 4 यांना प्रत्येकी दोन या प्रमाणात देण्यात येईल.